सकाळ

सोमवार, ८ मार्च २०२१

## शिवाजी कॉलेजमध्ये व्याख्यानमाला

**सातारा, ता. ७ :** छत्रपती शिवाजी कॉलेजच्या इतिहास विभागामार्फत राष्ट्रीय उच्चतर शिक्षा अभियानांतर्गत (रुसा) नुकतीच व्याख्यानमाला झाली. त्यात प्रा. भीमाशंकर बिराजदार यांनी पर्यावरण आणि भारतीय संस्कृती, डॉ. संतोष बाबरे यांनी राजमाता जिजाऊ, डॉ. सुरेश चव्हाण यांनी शिवकाळ आणि समकालीन समाज, डॉ. मधुकर जाधव यांनी छत्रपती शिवाजी महाराज यांची आदर्श स्त्री-नीती, प्रा. आकाश चव्हाण यांनी साहित्यरत्न अण्णा भाऊ साठे, प्रा. समाधान जाधव यांनी आधुनिक महाराष्ट्रातील स्त्रियांच्या चळवळी, तसेच डॉ. रामचंद्र कुंभार यांनी कर्मवीर भाऊराव पाटील आणि महात्मा गांधी यांच्यातील सौहार्दपूर्ण संबंध, डॉ. अजितकुमार जाधव यांनी साताऱ्याचे छत्रपती आणि चतुरसिंग भोसले, प्रा. गौतम काटकर, तसेच प्रा. महावीर मुळे यांनीही विविध विषयांवर विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. व्याख्यानमालेसाठी उपप्राचार्या प्रा. डॉ. अनिसा मुजावर, डॉ. अनिलकुमार वावरे, 'रुसा'चे समन्वयक डॉ. सुभाष कारंडे आदींनी परिश्रम घेतले.

ग्रंथपाल
छत्रपती शिवाजी कॉलेज
सातारा. जि. सातारा.

प्राचार्य
छत्रपती शिवाजी कॉलेज,
सातारा